| CNRNO:MHAM080001352015 | नियमित फौजदारी खटला क्रमांक २२/२०१५ | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :- | २५.०२.२०१५ | | |
| | नोंदणी तारीख | :- | २५.०२.२०१५ | | |
| | निकाल तारीख | :- | २४.०४.२०२५ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिना | दिवस |
| | | | १० | ०१ | २९ |
| | निशानी क्रमांक | :- | ९१ | | |

फॉर्म क्रमांक ३२

भाग अ

न्यायनिर्णय

[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (i)]

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भातकुली, ता. भातकुली,

जिल्हा – अमरावती यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी विजय गो. परवरे )

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक २४.०४.२०२५)

नियमीत फौजदारी खटला क्र.२२/२०१५

सरकार विरुध्द अजय भारत तायडे  व इतर

अपराध क्रमांक १०५/२०१४ पोलीस स्टेशन, खोलापुर

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, खोलापुर , ता. भातकुली, जिल्हा – अमरावती. |

| | |
|---|---|
| अभियोग पक्षातर्फे वकील | **श्री. व्ही.बी.चांदुरकर,** सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **२. श्रीमती ललिता भारत तायडे,**<br>वय– ५५ वर्ष, व्यवसाय–मजुरी,<br>रा. जामठी, ता. मुर्तिजापुर, जिल्हा अकोला.<br>**३. अरविंद किसनराव ढोके**,<br>वय–४२ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>**४. सौ. संगीता अरविंद ढोके**,<br>वय–३७ वर्ष, व्यवसाय – घरकाम,<br>अ.क्र.०३ व ०४ रा.मधलापुर, ता.भातकुली,<br>जि. अमरावती. |
| आरोपींतर्फे अधिवक्ता | **विद्वान विधिज्ञ श्री.अ.अ.साखरकर** |

**भाग ब**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (ii)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १३.११.२०१४ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १३.११.२०१४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २५.०२.२०१५ |
| दोषारोपपत्र ठेवल्याचा दिनांक | २१.११.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २३.०१.२०२३ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | २४.०४.२०२५ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

## आरोपीचा तपशील

| आ क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | श्रीमती ललिता भारत तायडे | १२.१२.२०१४ | १२.१२.२०१४ | भा.दं.वि.१८६० चे कलम ४९८–अ, ५०४ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |
| ३. | अरविंद किसनराव ढोके | १२.१२.२०१४ | १२.१२.२०१४ | भा.दं.वि.१८६० चे कलम ४९८–अ, ५०४ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |
| ४. | सौ. संगीता अरविंद ढोके | १२.१२.२०१४ | १२.१२.२०१४ | भा.दं.वि.१८६० चे कलम ४९८–अ, ५०४ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

## न्यायनिर्णय

## (पारीत दिनांक २४.०४.२०२५ )

प्रस्तुतचा खटला हा पोलीस स्टेशन, खोलापुर अधिकारी यांनी आरोपी विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ, ५०४ सहकलम ३४ अन्वये आरोपपत्र दाखल केल्यामुळे चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन आहे की,–

फिर्यादी सौ. प्रिया अजय तायडे हिचे लग्न दिनांक २६.०४.२०१३ रोजी मयत आरोपी क्र.०१ अजय भारत तायडे, रा.जामठी, ता.मुर्तिजापुर, जिल्हा अकोला याचे सोबत झाले. त्यानंतर ती मयत आरोपी क्र.०१ सोबत पुणे येथे नादांयला गेली असता त्याठिकाणी तिची सासु आरोपी क्र.०२ श्रीमती ललिता भारत तायडे ही सोबत राहत होती. त्या लग्न संबंधातून तिने एक मुलगा नाम सार्थक वय ६ महिने याला जन्म दिला. त्यादरम्यान तिचा पती मयत आरोपी क्र.०१ अजय तायडे हा तिला *"वडीलांनी हुंडा कमी दिला"* असे म्हणून शिवीगाळ व मारहाण करुन मानसीक त्रास देत होता. त्यावेळी तिचे नंदोई आरोपी क्र.०३ व नंणद आरोपी क्र.०४ हे तिच्या सासरी येवून तिचा पती मयत आरोपी क्र.०१ व सासु आरोपी क्र.०२ यांना भडकावून देवून देत होते तसेच ते तिला लग्नात हुंडा कमी दिल्याच्या कारणावरुन शिवीगाळ करीत होते. त्याठिकाणी ती एकटीच पडली असल्याने तिचे कोणीही ऐकत नव्हते. त्यामुळे तिने तिच्या वडीलांना फोन द्वारे माहिती दिली असता तिचे वडील पुण्याला आले आणि ती आपल्या मुली सह माहेरी वाठोडा शु. येथे आली. त्या ठिकाणी तिने मुलगा सार्थक याला जन्म दिला. त्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये सुध्दा तिचा पती मयत आरोपी क्र.०१ हा तीन ते चार वेळा तिच्या माहेरी आला आणि त्याने हुडयांच्या कारणावरुन वाद करुन शिवीगाळ केली. त्यामुळे तिने आरोपींविरुध्द तक्रार अर्ज दाखल केला. त्यावरुन प्रकरण हे महीला सेल अमरावती येथे चालविण्यात आले. त्याठिकाणी त्यांच्यात तडजोड झाली नाही म्हणून प्रकरण पोलीस स्टेशन, खोलापुर येथे पाठविण्यात आले.

**३.** फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये समेट घडून न आल्यामुळे फिर्यादीच्या फिर्यादी आधारे पो.स्टे. खोलापुर यांनी आरोपीं विरुध्द अप.क्र.१०५/२०२४, कलम ४९८–अ, ५०४ सहकलम ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हयाची नोंद केली. प्रकरणातील तपास हा पोहेकॉ गजानन ठाकुर, ब.नं.६२०, यांना सोपवण्यात आला. त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळावर जावून घटनास्थळ पंचनामा दोन पंचासमक्ष तयार केला, फिर्यादीचे व साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपास पूर्ण होताच आरोपी विरुध्द कलम ४९८–अ, ५०४ सह ३४ भा.द.वि. अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपी क्र.०१ अजय भारत तायडे हा चौकशी दरम्यान फरार असल्यामुळे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र.२९ वर आदेश पारीत करुन आरोपी क्र.०२ ते ०४ यांची संपरीक्षा आरोपी क्र.०१ पासून वेगळी केली. त्यानंतर पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी क्र.०२ ते ०४ आणि अभियोग पक्षाचे दोषारोप पत्रावर म्हणने ऐकल्यानंर आरोपी क्र.०२ ते ०४ विरुध्द कलम ४९८–अ, ५०४ सहकलम ३४ भा.द.वि. अन्वये दोषारोप (नि.क्र.३५) निश्चीत केला. त्यावर आरोपी क्र.०२ ते ०४ यांनी गुन्हा कबुल नसल्याची जबानी (अनुक्रमे नि.क्र.३६ ते नि.क्र.३८) देवून खटला चालविण्याची मागणी केली.

**५.** अभियोग पक्षाने आरोपी विरुध्दचा आरोप सिध्द करण्यासाठी एकूण नऊ साक्षीदार तपासले. अभियोगपक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपी विरुद्ध गुन्हायुक्त स्थिती आल्यामुळे आरोपींचे कलम ३१३ फौ.प्र. सं. नुसारचे बयाण (अनुक्रमे नि.क्र.७० ते नि.क्र.७२) नोंदविण्यात आले .

**६.** दोषारोपत्राचे अवलोकन करून आणि त्यावर अभियोग पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर पुढील मुद्दे माझ्या विवेचनार्थ निघतात. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दिनांक १३/११/२०१४ रोजी ग्राम वाठोडा शु., ता. भातकुली, जि. अमरावती येथे आरोपी | ...नाही.. |

| | | |
|---|---|---|
| | क्र.०२ ते ०४ यांनी मयत आरोपी क्र.०१ सोबत संगनमत करुन फिर्यादी सौ. प्रिया अजय तायडे हिला बेकायदेशीरपणे पैशाची मागणी करुन तिचा शारीरीक व मानसीक छळ केला आणि त्याव्दारे भा.द.वि.चे कलम ४९८–अ सह ३४ अन्वये गुन्हा केला? | |
| ०२. | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, आरोपी क्र.०२ ते ०४ यांनी मयत आरोपी क्र.०१ सोबत संगनमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रक्षोभन दिले आणि त्याव्दारे भा.द.वि.चे कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | ...नाही .. |
| ०३. | आदेश काय ? | ...अंतीम आदेशान्वये |

## निष्कर्षाची कारणमिमांसा

**मुद्दा क्र.०१ व ०२ बाबत :–**

**७.** अभियोग पक्षाने आरोपी विरुध्दचा दोषारोप लक्षात घेता वाजवी संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे की, घटनेच्या दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला हुंडयाची मागणी केली, त्याकरीता तिचा शारीरीक व मानसीक छळ केला, तिला मारहाण केली व तिचा उद्देशपूर्वक अपमान करुन तिला सार्वजनिक शांतता भंग करण्यास प्रशोभन दिले.

८. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सा.क्र.०१ सौ. प्रिया अजय तायडे हिच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, ती सर्व आरोपींना ओळखते. आरोपी क्र.०१ हा तिचा पती असुन आरोपी क्र.०२ ते ०४ हे तिच्या पतीचे नातेवाईक आहेत. तिचे लग्न दिनांक २६.०४.२०१३ रोजी आरोपी क्र.०१ सोबत वाठोडा शु., ता.भातकुली, जि. अमरावती येथे झाले. त्यानंतर ती नांदण्यासाठी पुणे येथे सासरी गेली. त्याठिकाणी तिच्या सोबत तिचा पती व सासु राहत होते. ते तिला हुंडयासाठी छळत होते आणि तिला मानसिक त्रास देत होते. सदर त्रासाबाबत ती तिच्या वडीलांना सांगत होती. तिचे नणंद व नंदोई हे सुध्दा पुणे

येथे येवून तिच्या पतीला तिला मारण्याकरीला सांगत होते. त्याठिकाणी ती अंदाजे एक वर्ष राहीली. त्यानंतर ती गर्भवती राहीली. त्यावेळी तिच्या वडीलांनी तिला ग्राम वाठोडा शु. येथे आणले. तिथे देखील आरोपी क्र.०१ ने येवून तिला मारहाण केली होती. तिचे नणंद व नंदोई तिच्या मुलाच्या नामकरणाच्या दिवशी तिच्या माहेरी आले आणि त्यांनी तिच्यासोबत हुंडयाबाबत वाद घातला. त्यानंतर तिने पो.स्टे. खोलापुर येथे तक्रार दिली. सदरहू साक्षीदारने आपल्या साक्षी दरम्यान तिची तक्रार (नि.क्र.४२) व त्यावरून घेण्यात आलेली प्रथम खबर (नि.क्र.४३) या वरील सही ओळखली आणि त्यातील मजकूर बरोबर असल्याचे कथन केले.

सदरहु साक्षीदारच्या उलटतपासणीत असे आले आहे की, तिचे आरोपी क्र.०१ सोबत लग्न ठरवून झाले होते. त्यामुळे हुंडा देण्या घेण्याचा प्रश्न नव्हता. तिने पोलिसांना पुणे येथे राहत असल्या बाबतची भाडे पावती दिली नव्हती. तिची खावटीची केस चालू असतांना आरोपी क्र.०१ हा तिच्या सोबत राहत नव्हता. आरोपी क्र.०१ हा वाठोडा शुक्लेश्वर येथून निघून गेला होता. तिने रिपोर्ट देतेवेळी *“तिचे नणंद व नंदोई पुणे येथे येत होते, ते तिच्या पतीला मारण्याकरीता सांगत होते, तिच्या मुलाच्या नामकरणाच्या दिवशी तिची नणंद व नंदोई आले होते, त्यांनी देखील तिच्यासोबत हुंडयाबाबत वाद घातला होता”* याबाबी सांगून सुद्धा रिपोर्ट मध्ये नमूद नसल्याचे कारण तिला सांगता येणार नाही. तिने रिपोर्ट व पोलीस बयान देताना *"तेथे देखील तिचा पती आरोपी क्र.०१ हा तिला त्रास देत होता, त्याने तिला वाठोडा शुक्लेश्वर येथे मारहाण केली"* या बाबी सांगून सुद्धा नमूद नसल्याचे कारण तिला सांगता येणार नाही.

**९.** फिर्यादीचे वडील सा.क्र.०२ विलास सुखदेवराव थोरात यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, फिर्यादी ही त्याची मुलगी आहे. आरोपी क्र.०१ हा त्याचा जावाई असून आरोपी क्र.०२ ते ०४ हे त्याच्या जावाईचे नातेवाईक आहे. त्याच्या मुलीचा व आरोपी क्र.०१ चा विवाह दिनांक २६/०४/२०१३ रोजी वाठोडा शुक्लेश्वर येथे झाले होता. त्यानुसार त्याची मुलगी नांदण्यासाठी पुणे येथे गेली होती. त्या ठिकाणी त्याची मुलगी १२ महिने राहिली. त्या दरम्यान त्यांच्या मुलीने त्याला फोनवर *"तिची सासू व पती तिला*

*हुंड्या साठी त्रास देत आहे"* असे सांगितले होते. त्यानंतर त्याने यांच्या मुलीला समजावून सांगितले होते. त्यानंतर त्या ठिकाणी त्याच्या मुलीचे नणंद व नंदोई आले. त्यांनी देखील त्याच्या मुलीचा छळ केला. त्याच्या मुलीचे नणंद व नंदोई हे तिला पैश्यासाठी त्रास देत होते. त्यानंतर तो त्यांच्या मुलीला माहेरी घेऊन आला. त्यानंतर तो मुली सोबत पोलीस स्टेशनला गेला आणि त्याच्या मुलीने पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्याचे बयान पोलिसांनी नोंदविले होते.

सदरहू साक्षीदारच्या उलट तपासणीमध्ये असे आले आहे की, त्याची मुलगी प्रिया व आरोपी क्र.०१ चा विवाह ठरवून झाला होता. त्यांच्या विवाहातील बोलणी लग्ना पूर्वीच ठरली होती. त्यामध्ये हुंडा घेण्या–देण्याचे काही ठरले नव्हते. त्याने तपासादरम्यान पोलिसांना मुलगी पुणे राहात होती याबाबत भाडे पावती किंवा ईतर दस्त दिले नव्हते. त्याने आपल्या पोलीस बयान मध्ये *"त्याच्या मुलीने फोन केला, आरोपींनी तिचा छळ केला, त्याच्या मुलीने नणंद नंदोई त्याच्या मुलीकडे आले होते"* यांची तारीख सांगितली नव्हती.

**१०.** फिर्यादीची आई सा.क्र.०३ सुमन विलास थोरात हिच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, फिर्यादी ही तिची मुलगी आहे. आरोपी क्र.०१ हा तिचा जावई आहे आणि आरोपी क्र.०२ ते ०४ हे जावयाचे नातवाईक आहे. तिच्या मुलीचा आणि आरोपी क्र.०१ चा विवाह अंदाजे दहा वर्षापूर्वी वाठोडा शुक्लेश्वर येथे झाला होता. त्यानंतर तिची मुलगी पुणे येथे नांदण्यासाठी गेली होती. तिच्या मुलीने फोन करून *"आरोपीं तिला हुंड्यासाठी त्रास देत आहे, तिचा छळ करीत आहे, आरोपी क्र.०३ व ०४ हे पुणे येथे येवून त्रास देत आहे, तिला खूप त्रास होत आहे"* असे सांगितले होते. त्यानंतर तिच्या मुलीने पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. तिचे बयान पोलिसांनी नोंदविले होते.

सदरहू साक्षीदारच्या उलट तपासणी मध्ये असे आले आहे की, तिच्या मुलीचे नणंद नंदोई हे कधी पुणे येथे आहे होते यांची तिला माहिती नाही.

**११.** फिर्यादीचा भाऊ सा.क्र.०६ अमोल विलासराव थोरात यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, फिर्यादी ही त्याची बहिण आहे. तो आरोपींना ओळखतो. आरोपी

क्र.०१ हा त्याचा जावई आहे आणि आरोपी क्र.०२ ते ०४ हे जावयाचे नातवाईक आहेत. त्याची बहिण प्रिया आणि आरोपी क्र.०१ चा विवाह हा दिनांक २६/०४/२०१४ रोजी वाठोडा शुक्रेश्वर येथे झाला होता. त्यानंतर त्याची बहिण नांदण्यासाठी पुणे येथे गेली होती. त्याठिकाणी आरोपी क्र.०१ व आरोपी क्र.०२ हे दोन ते तीन महिने चांगले राहिले. त्यानंतर फोन आला की, ते हुंडा मागत आहे. त्यांवेळी त्यांनी सांगितले की, काही दिवस काढून पहा. त्याच वर्षी त्याच्या बहिणीचा बाहेरून फोन आला की, आरोपींनी मारहाण केली आणि हुंड्याची मागणी केली. त्यानंतर त्याचे वडील फिर्यादीला आणायला गेले आणि तिला त्याचवर्षी माहेरी घेऊन आले. त्याची बहिण गर्भवती होती. त्यानंतर तिला मुलगा झाला. सन २०१५ साली त्याच्या जावयाचा फिर्यादीला फोन आला होता. त्याच्या बहिणीच्या मुलाच्या बारश्यासाठी तिचे नणंद व नंदोई आले होते. त्यावेळी आरोपी क्र.०१ हा आठ ते दहा दिवस वाठोडा शुक्रेश्वर येथे राहिला. त्यावेळी आरोपी क्र.०१ ने आठ दिवस दवाखाण्यात काम केले. त्यानंतर तो निघून गेला. त्यानंतर पासून तो आला नाही. त्यानंतर त्याच्या बहिणीने पोलिसांना तक्रार दिली होती. त्याचे बयान पोलिसांनी नोंदविले होते.

सदरहू साक्षीदारच्या उलट तपासणी मध्ये असे आले आहे की, त्याने आपल्या पोलिस बयाणात *"त्याच वर्षी त्याच्या बहिणीचा बाहेरून फोन आला की, आरोपींनी मारहाण केली आणि हुंड्याची मागणी केली, त्यावेळी तिला आम्ही सांगितले की, काही दिवस काढून पहा, त्यावेळी त्याच्या जावयाचा बहिणीला फोन आला होता, त्यानंतर ते वाठोडा शुक्रेश्वर येथे आले, त्यावेळी आरोपी क्र.०१ ने आठ दिवस दवाखाण्यात काम केले. त्यानंतर तो निघून गेला. त्यानंतर पासून तो आला नाही"* या बाबी सांगून सुद्धा नमूद नसल्याचे कारण तो सांगू शकत नाही.

**१२.** फिर्यादीचा भाऊ सा.क्र.०७ अतुल विलास थोरात याच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, फिर्यादी ही त्याची बहिण आहे. आरोपी क्र.०१ हा त्याचा जावाई आहे आणि आरोपी क्र.०२ ते ०४ हे जावयाचे नातवाईक आहेत. त्याची बहिण प्रिया हिचा आरोपी क्र.०१ सोबत विवाह हा दिनांक २६/०४/२०१४ रोजी वाठोडा शुक्रेश्वर येथे झाला होता. त्यानंतर त्याची बहिण पुणे येथे नांदायला गेली होती. त्याठिकाणी एक

महिन्यानंतर तिला त्रास देणे सुरु झाले. तिला आरोपी हुंड्या करिता पैशे आणले नाही असा त्रास देत होते. त्याच्या बहिणीने सदरची माहिती फोनवर दिली होती. त्यानंतर त्याच्या वडिलांनी त्याच्या बहिणीला वाठोडा शुक्लेश्वर येथे आणले. त्याची बहिण वाठोडा शुक्लेश्वर येथे आल्यानंतर पाच ते सहा महिने वाठोडा शुक्लेश्वर येथे होती. त्या काळामध्ये त्याच्या बहिणीला मुलगा झाला होता. त्यावेळी त्याच्या बहिणीला भेटण्यासाठी त्याचे जावाई वाठोडा शुक्लेश्वर येथे आले होते. त्यानंतर त्याच्या जावयाने वाद घातला. त्यानंतर याच्या बहिणीचे नणंद व नंदोई सुद्धा आले होते. त्यांनी सुद्धा हुंड्यासाठी वाद घातला होता. त्या सर्व त्रासाला कंटाळून त्याच्या बहीणीने पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. त्याच्या बहिणीची तक्रार ही महिला दक्षता केंद्र अमरावती येथे पाठविण्यात आली होती. त्याठिकाणी समझोता झाला नाही. त्यानंतर त्याच्या बहिणीने तक्रार दिली. त्याचे बयान पोलिसांनी नोंदविले होते.

सदरहू साक्षीदारच्या उलट तपासणी मध्ये असे आले आहे की, त्याचे बहिणीचे आणि जावयाचे आपसात पटत नव्हते. तो आरोपी कोणत्या तारखेला आले होते हे सांगू शकत नाही. त्याने आपल्या पोलीस बयानात *"पुणे येथे गेल्यानंतर एक महिन्यानंतर तिला त्रास देणे सुरु झाले, तिला आरोपी हुंड्या करिता पैशे आणले नाही असा त्रास देत होते"* या बाबी सांगून सुद्धा नमूद नसल्याचे कारण त्याला सांगता येणार नाही.

**१३.** सा.क्र.०८ विनायक रंगराव बुरघाटे याच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, तो फिर्यादीला शेजारी राहत असल्यामुळे ओळखतो. आरोपी क्र.०१ फिर्यादीचा पती आहे तर आरोपी क्र.०२ ते ०४ हे आरोपी क्र.०१ चे नातेवाईक आहेत. फिर्यादीचा विवाह आरोपी क्र.०१ सोबत दिनांक २६/०४/२०१४ रोजी वाठोडा शुक्लेश्वर येथे झाला. त्यानंतर फिर्यादी मुंबईला नांदायला गेली. त्या ठिकाणी फिर्यादी पाच ते सहा महिने राहिली आणि नंतर गावाला परत आली. फिर्यादी ही तीचे वडील विलास थोरात यांच्या सह राहते. तिला दोन मुले आणि एक मुलगी आहे. लग्नानंतर फिर्यादी पुणे येथे नांदायला गेली होती. त्याठिकाणी ती पती आणि सासू सोबत राहत होती. त्यांचा संसार पाच ते सहा महिने चालू होता. त्याला विलास थोरात कडून माहिती झाले की, सासर कडील मंडळी फिर्यादी प्रिया

हिला हुंड्या करिता त्रास देत आहे. त्यावेळी त्याला माहिती होते की, फिर्यादी प्रिया हिचा फोन येत होता. त्यामुळे विलास थोरात हे त्यांच्या मुलीला माहेरी घेऊन आले. त्यावेळेस पासून फिर्यादी प्रिया हि वाठोडा शुक्लेश्वर येथे राहत आहे. त्यानंतर तिला मुलगा झाला. फिर्यादी प्रिया हिला मुलगा झाल्यानंतर तिचे नणंद–नंदोई हे वाठोडा शुक्लेश्वर येथे आले होते. त्यावेळी तिच्या नणंद–नंदोई यांनी तिच्या सोबत वाद घातला होता. त्या सर्व त्रासामुळे फिर्यादीने पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता.

सदरहू साक्षीदारच्या उलट तपासणीमध्ये असे आले आहे की, तो दिवस व रात्रभर विलास थोरात यांच्या घरी बसत नाही. तो फिर्यादी प्रिया हिचे नणंद–नंदोई कोणत्या तारखेला, महिन्याला, वर्षाला आले होते सांगू शकत नाही. त्याला फिर्यादीचा फोन कधी आला होता माहिती नाही.

**१४.** घटनास्थळ पंच सा.क्र.०४ देवेंद्र ज्ञानराव डाखोरे यांच्या साक्षीमध्ये असे आले आले आहे की. तो आरोपी आणि फिर्यादीला ओळखतो. फिर्यादी ही त्याच्या गावात राहते. त्याला दिनांक १४.११.२०१४ रोजी पोलिसांनी पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. त्याच्या समक्ष पोलिसांनी पंचनामा तयार केला होता. तो किती वाजता तयार केला होता हे त्याला आठवत नाही. तो घटनास्थळ पंचनाम्या साठी विलास थोरात आणि फिर्यादी प्रिया हिच्या घरी गेला होता. त्याला पोलिसांनी पंचनामा हा फिर्यादी आणि आरोपी अजय तायडे याच्या भांडणाचा होता असे सांगितले होते. सदरहू साक्षीदारने आपल्या साक्षी दरम्यान घटनास्थळ पंचनाम्यावरील आपली सही ओळखली परंतु त्यातील मजकूर माहिती नसल्याचे कथन केले.

सदरहू साक्षीदारच्या उलट तपासणीमध्ये असे आले आहे की, त्याने पोलिसांनी पूर्वीच लिहेलेल्या कागदावर सही केली होती. त्याला पोलिसांनी सही कर असे म्हंटले म्हणून त्याने सही केली होती. त्याचे विलास थोरात आणि फिर्यादी प्रिया तायडे यांच्या सोबत चांगले सबंध आहे. त्याला फिर्यादी आणि आरोपी यांच्या वादा बाबत माहिती नाही.

**१५.** घटनास्थळ पंच सा.क्र.०५ अमोल राधाकिसन तायडे याच्या साक्षीमध्ये

असे आले आहे की, तो आरोपी अजय तायडे याला ओळखतो. तो आरोपी क्र.०३ व ०४ यांना ओळखत नाही. तो फिर्यादी प्रिया हिला नातेवाईक असल्यामुळे ओळखतो. त्याला दिनांक १४/११/२०१४ रोजी पोलिसांनी घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. सदरहू साक्षीदारने आपल्या साक्षी दरम्यान घटनास्थळ पंचनाम्यावरील आपली सही ओळखली व त्यातील मजकूर बरोबर असल्याचे कथन केले.

सदरहू साक्षीदारच्या उलट तपासणीमध्ये असे आले आहे की, त्याने पोलिसांनी पूर्वीच लिहलेल्या कागदावर सही केली होती. त्याने पंचम्यावर सही केल्यामुळे त्याला त्यामध्ये काय लिहले आहे याची माहिती नाही.

**१६.** तपास अधिकारी सा.क्र.०९ याच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, तो दिनांक १३.११.२०१४ रोजी पो.स्टे. खोलापुर येथे स्टेशन डायरी अमलंदार म्हणून कार्यरत होता. त्यादिवशी त्याची डयुटी दुपारी ०२.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यत होती. त्यादिवशी फिर्यादी प्रिया तायडे ही रिपोर्ट देण्यासाठी आली होती. तिने लेखी रिपोर्ट दिला होता. त्या रिपोर्टवर त्याची समक्ष म्हणून सही आहे. त्यातील मजकुर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला होता. त्यातील मजकुर फिर्यादप्रमाणे बरोबर आहे. त्यानंतर तपास हा पोहेकॉ गजानन ठाकुर यांना सोपविण्यात आला होता.

सदरहु साक्षीदारच्या उलट तपासणीमध्ये असे आले आहे की, फिर्यादीने आपल्या रिपोर्टमध्ये तिचे नणंद नंदोई हे पुणे येथे येत होते, ते तिच्या पतीला मारण्यासाठी सांगत होते, तिच्या मुलाच्या नामकरणाच्या दिवशी देखील तिचे नंदोई व नणंद आले होते, त्यांनी देखील तिच्यासोबत हुंडयाबाबत वाद केला होता, तिचे पती आरोपी क्र.०१ अजय तायडे हे तिला पुणे येथे त्रास देत होते या बाबी सांगितल्या नव्हत्या.

**१७.** अभियोग पक्षातर्फे विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता श्री व्ही.बी.चांदुरकर तर आरोपी पक्षातर्फे विद्वान वकील श्री. अ.अ.साखरकर यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

**१८.** न्याय प्रस्थपित फौजदारी तत्वानुसार अभियोग पक्षाने आरोपी विरुद्धचा

दोषारोप हा वाजवी संशयापलीकडे सिद्ध करणे गरजेचे आहे. जो पर्यंत आरोपी विरुद्धचा दोषारोप वाजवी संशयापलीकडे सिद्ध होत नाही तो पर्यंत आरोपीला गुन्ह्याचा दोषी धरता येत नाही. आरोपी विरुद्धचा दोषारोप वाजवी संशयापलीकडे सिद्ध करण्यासाठी फक्त एका नैसर्गिक आणि विश्वासहार्य साक्षीदारची साक्ष पुरेशी आहे परंतु त्या साक्षीदारांचे साक्षीवर काही कारणास्तव विश्वास ठेवणे अवघड असेल तर त्या साक्षीदारांची साक्ष विचारार्थ घेण्यापुर्वी त्याच्या साक्षीला ईतर स्वतंत्र साक्षीदारचे साक्षीपासून दुजोरा मिळतो किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे.

१९. उपरोक्त न्याय प्रस्थापित तत्वानुसार अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर दिसून येते की, घटनास्थळ पंच सा.क्र.०४ देवेंद्र ज्ञानराव डाखोरे याने अभियोग पक्षाला मदत केली नाही तर दुसरा घटनास्थळ पंच सा.क्र.०५ अमोल तायडे याने आपल्या साक्षीमध्ये मान्य केले आहे की, त्याने पोलिसांनी पूर्वीच लिहेलेल्या कागदावर सही केली होती, त्याला पोलिसांनी सही कर असे म्हंटले म्हणून त्याने सही केली होती, त्याचे विलास थोरात आणि फिर्यादी प्रिया तायडे यांच्या सोबत चांगले सबंध आहे, त्याला फिर्यादी आणि आरोपी यांच्या वादा बाबत माहिती नाही. त्याच प्रमाणे फिर्यादीच्या माहेरचा शेजारी सा.क्र.०८ विनायक रंगराव बुरघाटे याने आपल्या साक्षी मध्ये स्वतःहून कथन केले आहे की, त्याला विलास थोरात कडून माहिती झाले की, सासर कडील मंडळी ही फिर्यादी प्रिया हिला हुंड्या करिता त्रास देत आहे. त्यामुळे दिसून येते की, सदरहू साक्षीदार हा घटनेचा ऐकीव साक्षीदार आहे. त्याच प्रमाणे त्याने मान्य केले आहे की, तो दिवस व रात्रभर विलास थोरात यांच्या घरी बसत नाही. त्याला फिर्यादीचे नणंद–नंदोई कोणत्या तारखेला, महिन्याला, वर्षाला आले होते सांगता येणार नाही व त्याला फिर्यादीचा फोन कधी आला होता याची माहिती नाही. त्यामुळे दिसून येते की, अभियोग पक्षाने आरोपी विरुद्ध केलेला दोषारोप हा फिर्यादी/पिडीता सा.क्र.०१ प्रिया तायडे, तिचे वडील सा.क्र.०२ विलास थोरात, आई सा.क्र.०२ सुमन थोरात, भाऊ सा.क्र.०६ अमोल थोरात, दुसरा भाऊ सा.क्र.०७ अतुल थोरात यांच्या साक्षीपुराव्यावर अवलंबून आहे.

२०. फिर्यादी सा.क्र.०१ प्रिया तायडे ही घटनेची मुख्य साक्षीदार व पिडीता आहे

तर फिर्यादीचे वडील सा.क्र.०२ विलास थोरात, आई सा.क्र.०३ सुमन थोरात, भाऊ सा.क्र.०४ अमोल थोरात, दुसरा भाऊ सा.क्र.०७ अतुल थोरात हे फिर्यादीने फोनवर सांगितलेल्या घटनेचे ऐकीव साक्षीदार आहे आणि फिर्यादीच्या माहेरील घडलेल्या घटनेचे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत परंतु सदरहू साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केल्यानंतर दिसून येते की, त्यांच्या साक्षीमध्ये त्यांनी आरोपी विरुद्ध केलेले आरोप हे सर्वसाधारण आणि मोघम स्वरूपाचे आहेत आणि त्यामध्ये विशिष्ठता नाही. त्यामुळे सदरहू साक्षीदारांची साक्ष ही घटने संदर्भात साशंकता निर्माण करणारी आहे.

**२१.** फिर्यादी सा.क्र.०१ प्रिया तायडे हिची फिर्याद व साक्ष दर्शविते की, ती पुण्याला आरोपी सोबत राहत होती. त्यावेळी तिचा पती/आरोपी क्र.०१ हा तिला *"तुझ्या वडिलांनी हुंडा कमी दिला"* या कारणावरून शिवीगाळ करीत होता आणि तिला मारहाण करीत होता. त्यावेळी त्याठिकाणी तिचे नणंद–नंदोई हे येत होते. ते तिच्या पतीला व सासूला भडकावीत होते आणि तिला *"हुंडा कमी दिला"* म्हणून शिवीगाळ करीत होते परंतु त्याच संदर्भात तिची साक्ष दर्शविते की, तिचे आरोपी क्र.०१ सोबत ठरवून लग्न झाले होते. त्यामुळे हुंडा देण्या–घेण्याचा प्रश्न नव्हता. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, जर फिर्यादी आणि आरोपी क्र ०१ यांच्या लग्नामध्ये हुंडा ठरला नव्हता तर आरोपी तिला कोणता हुंडा मागत होते?. त्या संदर्भात तिच्या फिर्यादचे आणि साक्षीचे अजून बारकाईने अवलोकन केल्यानंतर दिसून येते की, फिर्यादीचा विवाह हा दिनांक २६/०४/२०१३ रोजी आरोपी क्र.०१ सोबत झाला आणि फिर्यादीने घटनेची फिर्यादी ही माहेरी आल्यानंतर व मुलाच्या जन्मानंतर लग्नापासून एक ते दीड वर्षाच्या आत दिलेली आहे. तरी सुद्धा फिर्यादीच्या फिर्यादमध्ये आणि साक्षीमध्ये आरोपींनी तिला हुंडा कोणत्या तारखेला, महिन्याला आणि वर्षाला आणि किती हुंडा मागितला हे नमूद नाही. त्याच प्रमाणे फिर्यादीच्या फिर्याद आणि साक्षीमध्ये सुद्धा आरोपी क्र.०३ व ०४ हे नेमके कोणत्या तारखेला, महिन्याला आणि वर्षाला पुणे येथे तिच्या सासरी आले होते?, त्यांनी आरोपी क्र.०१ व ०२ यांना नेमके काय म्हंटले होते?, त्यांनी तिला नेमका किती हुंडा मागितला होता? व त्यांनी तिला नेमकी काय शिवीगाळ केली होती? याबाबत काहीही नमुद नाही. त्यामुळे दिसून येते की, तिले

आरोपींविरुध्द केलेले आरोप सर्वसाधारण स्वरूपाचे आणि मोघम स्वरुपाचे आहे.

२२. फिर्यादी सा.क्र.०१ प्रिया तायडे हिची फिर्याद आणि साक्ष दर्शविते की, तिने आपल्या वडिलांना पुणे येथील घटने बाबत फोनवर सांगितले होते. त्यानंतर तिचे वडील तिला माहेरी घेऊन आले. त्यासंदर्भात फिर्यादी सा.क्र.०१ प्रिया तायडे हिचे वडील सा.क्र.०२ विलास थोरात, आई सा.क्र.०४ सुमन थोरात यांच्या साक्षीचे अवलोकन केल्यानंतर दिसून येते की, सदरहू साक्षीदारांची साक्ष सुद्धा फिर्यादीच्या फिर्याद प्रमाणे व साक्षी प्रमाणे मोघम स्वरुपाची आहे. सदरहू साक्षीदारांची साक्ष कोठेही दर्शवित नाही की, त्यांना फिर्यादीने कोणत्या तारखेला,महिन्याला आणि वर्षाला फोन केला होता?, आरोपींनी फिर्यादीला कोणत्या तारखेला, महिन्याला आणि वर्षाला हुंड्याची मागणी केली? आरोपींनी फिर्यादीला हुंड्यामध्ये कश्याची मागणी केली होती? त्यासाठी आरोपींनी फिर्यादीला नेमका काय त्रास देत होते?. त्यामुळे दिसून येते की, सदरहू साक्षीदारांची साक्ष सुद्धा सर्वसाधारण स्वरुपाची आणि मोघम स्वरुपाची आहे. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, आरोपींनी फिर्यादीला हुंड्याची मागणी केली किंवा नाही? त्या संदर्भात फिर्यादीचे वडील सा.क्र.०२ विलास थोरात हे आपल्या साक्षी मध्ये मान्य करतात की, फिर्यादी आणि आरोपीची बोलणी ही लग्ना पूर्वी ठरली होती. त्यामध्ये हुंडा घेण्या–देण्याचे काही ठरले नव्हते.

२३. फिर्यादी सा.क्र.०१ प्रिया तायडे हिच्या फिर्यादचे आणि साक्षीचे तिचा भाऊ सा.क्र.०६ अमोल थोरात, दुसरा भाऊ सा.क्र.०७ अतुल विलास थोरात व माहेरचा शेजारी सा.क्र.०८ विनायक रंगराव बुरघाटे यांच्या साक्षी सोबत अवलोकन केल्यानंतर दिसून येते की, सदरहू साक्षीदारांची साक्ष ही विसंगत स्वरुपाची आहे. फिर्यादी हिची फिर्याद आणि साक्ष कोठेही दर्शवित नाही की, लग्नाच्या एक किंवा दोन किंवा तीन महिन्यानंतर आरोपींनी तिला हुंड्याची मागणी केली परंतु त्याच संदर्भात तिचा भाऊ सा.क्र.०६ अमोल थोरात याची साक्ष दर्शविते की, लग्नाच्या दोन–तीन महिन्यानंतर आरोपींनी फिर्यादीला हुंड्याची मागणी करून त्रास दिला तर फिर्यादीचा दुसरा भाऊ सा.क्र.०७ अतुल थोरात याची साक्ष दर्शविते की, लग्नाच्या एक महिन्यानंतर आरोपींनी फिर्यादीला हुंड्याची मागणी करून त्रास दिला. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, लग्नानंतर आरोपींनी फिर्यादीला नेमका एक

महिन्यानंतर त्रास दिला किंवा दोन–तीन महिन्यानंतर त्रास दिला. त्या संदर्भात सदरहू साक्षीदारांच्या साक्षीचे अजून अवलोकन केल्यानंतर दिसून येते की, सदरहु साक्षीदारांनी सुद्धा आपल्या साक्षीमध्ये आरोपींनी फिर्यादीला किती हुंडा मागितला होता किंवा कोणत्यश हुंडयाची मागणी केली होती? याबाबत काहीही कथन केलेले नाही.

२४. फिर्यादी सा.क्र.०१ प्रिया तायडे हिची साक्ष दर्शविते की, तिने आपल्या साक्षी दरम्यान आरोपींची सूचना की, खावटीची केस चालू असतांना आरोपी क्र.०१ हा तिच्या सोबत माहेरी राहत होता ही बाब नाकारली. त्यानंतर तीने मान्य केले आहे की, आरोपी हा वाठोडा शुक्लेश्वर येथून निघून गेला होता. त्याच संदर्भातचा तिचा भाऊ सा.क्र.०६ अमोल थोरात याची साक्ष दर्शविते की, सन २०१५ साली त्याच्या जावयाचा फिर्यादीला फोन आला होता, त्याच्या बहिणीच्या मुलाच्या बारश्यासाठी तिचे नणंद व नंदोई आले होते, त्यावेळी आरोपी क्र.०१ हा आठ ते दहा दिवस वाठोडा शुक्लेश्वर येथे राहिला, त्यावेळी आरोपी क्र.०१ ने आठ दिवस दवाखाण्यात काम केले. त्यामुळे दिसून येते की, फिर्यादी पुणे येथून माहेरी आल्यानंतर आरोपी क्र.०१ हा फिर्यादी सोबत राहिला होता, त्याठिकाणी तो दवाखान्यामध्ये काम करीत होता. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, जर आरोपी क्र.०१ हा फिर्यादीला पुणे येथे राहत असतांना हुंड्याची मागणी करीत होता आणि त्याकरिता तो तिला त्रास देत होता तर फिर्यादी व आरोपी क्र.०१ सोबत वाठोडा शुक्लेश्वर येथे का राहीले. त्यावेळेसच फिर्यादीने कार्यवाही का नाही केली?. सदर प्रश्नांचे उत्तर अनुत्तरीत असल्यामुळे तसेच फिर्यादी सा.क्र.०१ प्रिया तायडे, तिचे वडील सा.क्र.०२ विलास थोरात, आई सा.क्र.०३ सुमन थोरात, भाऊ सा.क्र.०४ अमोल थोरात, दुसरा भाऊ सा.क्र.०७ अतुल थोरात यांची साक्ष सर्वसाधारण स्वरुपाची व मोघम स्वरुपाची असल्यमुळे त्यांच्या साक्षी सदंर्भात साशंकता निर्माण होते आणि त्या सांशकतेचा फायदा आरोपीच्या हक्कामध्ये जातो.

२५. अभियोग पक्षाने सादर केलेला साक्ष पुरावा व त्यावर केलेल्या विवेचानावरून दिसून येते की,अभियोग पक्ष हा दोषारोप प्रमाणे वाजवी संशयापलीकडे सिध्द करण्यात अपयशी ठरला आहे की, घटनेच्या दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी

फिर्यादीला हुंडयाची मागणी केली, त्याकरीता तिचा शारीरीक व मानसीक छळ केला, तिला मारहाण केली व तिचा उद्देशपूर्वक अपमान करुन तिला सार्वजनिक शांतता भंग करण्यास प्रक्षोभन दिले म्हणून मी मुद्दा क्र.०१ व ०२ चा माझा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.०३ चे उत्तर म्हूणन खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) आरोपी क्र.०२ श्रीमती ललिता भारत तायडे, आरोपी क्र.०३ अरविंद किसनराव ढोके व आरोपी क्र.०४ सौ. संगीता अरविंद ढोके यांना फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४९८–अ, ५०४, सहकलम ३४ अन्वये दंडनिय गुन्हा केल्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपी क्र.०२ ते ०४ यांचे वैयक्तीक बंधपत्रे व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३) आरोपी क्र.०२ ते ०४ यांच्याकडून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ चे अनुपालन संपरीक्षा संपण्याआधी करून घेण्यात आले.

४) आरोपी क्र.०१ अजय तायडे विरुध्द गैरजमानती अधिपत्र जारी करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायलयात अधिघोषित करण्यात आला)

VIJAY GOVIND PARWARE
Digitally signed by VIJAY GOVIND PARWARE
Date: 2025.04.28 16:52:23 +0530

विजय गो.परवरे

दिनांक : २४/०४/२०२५

ठिकाण : भातकुली.

**न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,**

**भातकुली**

## भाग क

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (**iii**)]

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

**अ. अभियोग :–**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ  साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | प्रिया अजय तायडे | फिर्यादी |
| सा.क्र. २ | विलास सुखदेव थोरात | साक्षीदार |
| सा.क्र. ३ | सुमन विलास थोरात | साक्षीदार |
| सा.क्र. ४ | देवेंद्र जानरावजी डाखोडे | घटनास्थळ पंच |
| सा.क्र. ५ | अमोल राधाकिसन तायडे | घटनास्थळ पंच |
| सा.क्र. ६ | अमोल विलासराव  थोरात | साक्षीदार |
| सा.क्र. ७ | अतुल विलासराव  थोरात | साक्षीदार |
| सा.क्र. ८ | विनायक रंगराव बुरघाटे | साक्षीदार |
| सा.क्र. ९ | राजकुमार उत्तमराव सावरकर | तपास अधिकारी |

**ब. बचाव साक्षीदार :–**

| **श्रेणी** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार :–**

| **श्रेणी** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| १ | ४२ | तक्रार |
| २ | ४३ | प्रथम खबर अहवाल |
| ३ | ४८ | घटनास्थळ पंचनामा (सहीपुरता) |
| ४ | ५० | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव :–**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी :–**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. मुद्देमाल :-

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

VIJAY GOVIND PARWARE
Digitally signed by VIJAY GOVIND PARWARE
Date: 2025.04.28 16:52:33 +0530

दिनांकः २४.०४.२०२५
भातकुली

(विजय गो. परवरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भातकुली.

## CERTIFICATE

''I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per original Judgment.''

| | |
|---|---|
| Name of Stenographer | : V.M.Bhangale |
| Name of Court | : Civil and Criminal Court, Bhatkuli |
| Judgment dictated on | : 24.04.2025 |
| Judgment Signed by | |
| Presiding Officer on | : 24.04.2025 |
| Judgment uploaded on | : 28.04.2025 |